**"ब्लड ऑन कॉल- जीवन अमृत सेवा" ही अभिनव योजना/उपक्रम महाराष्ट्रात सर्वत्र कार्यान्वीत करण्यास मंजूरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र.रारसे २०१३/ प्र.क्र.२२५/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार,
संकुल इमारत, नविन मंत्रालय, मुंबई,
दि. ३१ ऑक्टोबर २०१३.

**वाचा**:-१) सा.आ. विभाग, शासन निर्णय क्र.जिरूपी १०००/प्र.क्र.९०/आरोग्य-३ दि.१० जूलै २००१
२) वै.शि.व औ.द्र.द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमआयएस २००६/३०५/ सीआर-३३/प्र.क्र.९०/प्रशासन-२ दि..३० डिसेंबर २०१०

**प्रस्तावना:-**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.४ जानेवारी १९९६ रोजीच्या निदेशानुसार दि.४ जूलै १९९६ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रात राज्य रक्त संक्रमण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात सुरक्षित रक्ताचा पुरवठा वाजवी किमतीत करणे, राष्ट्रीय रक्त धोरणाची राज्यात अंमलबजावणी करणे राज्यात रक्त संक्रमण सेवा प्रभावी व बळकट होऊन गरजू रूग्णास दर्जेदार, सुरक्षित रक्त सहज उपलब्ध करून देणे ही राज्य रक्त संक्रमण परिषदेची मुख्य उद्दीष्टे आहेत. ज्यावेळी एखाद्या रूग्णास नर्सिंग होम किंवा रूग्णालयात दाखल असताना डॉक्टरांचे सल्ल्यानुसार रक्त चढवण्याची आवश्यकता असते, अशा वेळी रूग्णाच्या नातेवाईकास रक्तासाठी धावपळ करावी लागते व रूग्णास रक्त मिळण्यास विलंब होतो. रूग्णालयात दाखल असलेल्या रूग्णास आवश्यक असणाऱ्या रक्तासाठी त्याच्या नातेवाईकास धावपळ करावी लागू नये तसेच रूग्णास वाजवी दरात सुरक्षित रक्त पुरवठा व्हावा याकरिता राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या माध्यमातून **"ब्लड ऑन कॉल- जीवन अमृत सेवा"** ही योजना/उपक्रम सातारा व सिंधुदुर्ग जिल्हयात प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आली आहे. सदर योजना/उपक्रम मुंबईसह राज्यातील सर्व जिल्हयामध्ये टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील शासकीय/,खाजगी रूणालयात दाखल असलेल्या रूग्णास आवश्यक असणाऱ्या रक्तासाठी त्याच्या नातेवाईकास धावपळ करावी लागू नये तसेच रूग्णास वाजवी दरात सुरक्षित रक्त पुरवठा व्हावा याकरिता राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या माध्यमातून **"ब्लड ऑन कॉल- जीवन अमृत सेवा"** ही योजना/उपक्रम मुंबईसह राज्यातील सर्व जिल्हयामध्ये टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेची वैशिष्ठे खालीलप्रमाणे आहेत.

अ. जिल्हा सामान्य रूग्णालय तसेच वैद्यकीय महाविद्यालयाशी सलग्न रूग्णालयापासून १ तास अथवा ४० किलोमीटर अंतरावरील रूग्णालये व नर्सिंग होम यांना या योजनेच्या माध्यमातून रक्त किंवा रक्त घटक यांचा पुरवठा करण्यात येईल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी जिल्हयातील रूग्णालये व नर्सिंग होम यांची जिल्हा रक्तपेढीकडे नोंदणी करणे आवश्यक राहील.

ब. राज्यातील सर्व जिल्हयामध्ये तसेच मुंबईमध्ये आवश्यकतेनुसार रक्त साठवण केंद्रे उभारण्यात येतील.

क. सदर योजनेच्या अंमलबजावणीत वाहतूकीसाटी प्रत्येक जिल्हयात एक संस्था नेमण्यात येईल. रक्तपेढी/रक्त साठवण केंद्रापासून मोटारसायकलवरून कोल्डचेनद्वारे/शितसाखळीद्वारे या योजनेत संस्थेमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यामार्फत रूग्णालये व नर्सिंग होम्सना रक्त किंवा रक्त घटक यांचा पुरवठा करण्यात येईल. मोटार सायकलस्वारास विशिष्ट पोशाख व जॅकेट देण्यात येईल.

ड. रक्त पिशवीची प्रत्येकी किंमत रू.४५०/- इतकी आकारण्यात येईल. तसेच रक्त वाहतूकीसाठी अतिरिक्त खर्च १० किलोमीटरसाठी रू.५०/- आणि ११ ते ४० किलोमीटरसाठी रू.१००/- इतका आकारण्यात येईल.

इ. सदर योजनेसाठी लागणारा निधी राज्य रकत संक्रमण परिषदेच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

३. हे आदेश वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

३१/१०/२०१३

(ज्ञा.ल.सुळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, पंचदीप भवन, लोअर परेल, मुंबई
अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका,मुंबई,
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण सोसायटी, महाराष्ट्र/ मुंबई,
संचालक, आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई,
संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, रविंद्र अनेक्स, चर्चगेट, मुंबई,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सह संचालक, आरोग्य सेवा (हि.ह.व ज.रो.) सेंट्रल बिल्डींग, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे-१,
उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, जी.टी.हॉस्पीटल, मुंबई,
उपसंचालक, आरोग्य सेवा,ठाणे/नाशिक/पुणे/कोल्हापूर/औरंगाबाद/अकोला/लातूर/ नागपूर परिमंडळ.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य सेवा, गडचिरोली/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/यवतमाळ/नांदेड,
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय.
सचिव (२), (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय.
उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय (सर्व).
निवडनस्ती (आरोग्य-५)